# वि.दि.मु.क्र.४/२०११ मध्ये नि.६१ लगत आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रकिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती होवुन मिळणेसाठी आहे. वादीचे म्हणने प्रमाणे दावा टंकलिखीत करत असताना टंकलेखनिकाकडुन अनावधानाने दाव्याचे कलम १—ब मधील पुर्वेस, १—क मधील क्षेत्रफळात तसेच याच कलमातील ओळ क्र.३ मध्ये २४ फुट ऐवजी ४५ फुट आणि कलम ५ मधील ओळ क्र.४ मध्ये असलेला ''परंतु इसार पावती प्रतिवादी क्र.२ याचे नावे केली'' हा मजकुर वगळुन त्याच कलमात दस्त क्र.३४७१ ऐवजी ३४७२ आणि त्याच कलमातील ओळ क्र.२५ मध्ये सख्खा मेव्हणा ऐवजी सख्खा भाच्चा अशा दुरुस्त्या करणे आवश्यक आहे. या चुका टंकलेखनातील चुका असुन अनावधानाने झालेल्या आहेत. वरील प्रमाणे दुरुस्त्या केल्यास दाव्याचे रचनेत कोणताच बदल होत नाही किंवा त्यामुळे प्रतिवादींचे सुध्दा कोणतेही नुकसान होत नाही अथवा त्यांचे कोणत्याही हक्कांवर उलटपरिणाम होणार नाही.

याच अर्जावर प्रतिवादी तर्फे म्हणने मांडणेत येवुन अर्जास अतिविलंब झालेला आहे, दिलेली कारणे संयुक्तिक नाहीत, प्रस्तावित दुरुस्तीसाठी कोणताही कागदोपत्री पुरावा नाही व केवळ दाव्याचे अंतिम निर्णयास वेळ लागावा या हेतुने हा अर्ज दिला गेल्याचे कथन करत जोरदार हरकत नोंदविणेत आलेली आहे.

२) दोन्ही विद्वान वकिलांनी मांडलेला युक्तीवाद ऐकला. वादकथन आणि दाखल कागदपत्रांचे वाचन केले.

३) प्रस्तुतचा दावा वाटप आणि विभक्त ताबा मिळणेसाठी दाखल आहे. दावा अर्जाचे वाचन करता असे दिसुन येते की, यापुर्वीच वादीने नि.६० येथील आदेशा प्रमाणे दि.१९—८—२०१६ रोजी दुरुस्ती करुन घेतलेली आहे. मात्र त्या दुरुस्ती वेळी या अर्जात मागणी केलेली कोणतीही दुरुस्ती मागितली गेलेली नव्हती. संधी असताना सुध्दा नि.६० चे अर्जातच या अर्जातील दुरुस्त्या का मागितल्या गेल्या नाहीत याचा कोणताही खुलासा किंवा कसलेही स्पष्टीकरण वादीकडुन दिले गेलेले नाही. प्रस्तुतचा दावा सन २०११ पासुन प्रलंबित असताना सुध्दा वादीकडुन आज तारखेपर्यंत पुरावा दिला गेलेला नाही आणि रोजनामा असे दर्शवितो की, वादीनेच ऐनकेन प्रकारे दाव्यास विलंब केलेला आहे. हा अर्ज सुध्दा अतिविलंबाने दिला गेला आहे. मात्र प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलताना दिसुन येत नाही. तथा प्रस्तावित दुरुस्तीने दावा मिळकतीचे योग्य आणि

सविस्तर वर्णन दिले जावुन काही नातेसंबंध बदलणेत येत आहेत. त्यामुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होताना दिसत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादींच्या कोणत्याही हक्कांवर सुध्दा उलटपरिणाम प्रस्तावित दुरुस्तीमुळे होणारा नाही. तथा यापुर्वी नमुद केलेप्रमाणे हा दुसरा दुरुस्ती अर्ज आणि तोही अतिविलंबाने दाखल केला गेला असल्याने खर्च बसवुन मंजुर करणे जरुरीचे ठरते.

सबब पुढील प्रमाणे आदेश.

## :: आ दे श ::

वादीने आदेश तारखे पासुन चौदा दिवसांचे आत या अर्जाचे खर्चापोटी रु.५००/— सरकार जमा करण्याचे अटीवर हा अर्ज बहाल करणेत येत असुन मुदतीत ही खर्चाची रक्कम भरणा करुन मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेची आहे व दुरुस्त दावा प्रत न्यायपटलावर ठेवणेची आहे.

स्वाक्षरीत/—

माजलगांव.
दि.०७—११—२०१६

( शौ. रा. फकीर )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
माजलगांव